देशोन्नती

# स्वामी विवेकानंद विद्यालयात सायबर सुरक्षा अभियान

## विद्यार्थ्यांना ऑनलाइन फसवणुकीबाबत केले अवगत

देशोन्नती वृत्तसंकलन

**अकोट** : स्थानिक स्वामी विवेकानंद विद्यालयात विवक हिल फाउंडेशन पुणे व महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सुरक्षा कार्यशाळा घेण्यात आली.

यावेळी शंकरलाल खंडेलवाल विद्यालयातील विद्यार्थी सुमित सपकाळ व अनिकेत भुडके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सायबर सुरक्षा जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानामध्ये विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील



धोके, सुरक्षितता, उपाययोजना आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. वाढती गुन्हेगारी लक्षात घेता व वाढता सोशल मीडियाचा वापर लक्षात घेता आपण ऑनलाइन फसवणुकीला बळी पडत आहोत. तसेच आपण सोशल मीडियावर आपले जे वैयक्तिक फोटो, माहिती शेअर करतो तिचा सुद्धा गैरवापर होताना मोठ्या प्रमाणात दिसत आहे. त्यासोबतच ऑनलाइन फ्रॉड कॉल, बँकेतून ऑटोमॅटिक गायब होणारी रक्कम कशाप्रकारे फ्रॉड करून काढल्या जाते. तसेच मोबाइलचे व्यसन सोडवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. अभियानाचे उद्घाटन मुख्याध्यापिका जोशी यांनी केले. यावेळी शाळेचे शिक्षक धांडे, चव्हाण व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. (श.प्र.)

Akola Edition
Aug 13, 2024 Page No. 7
Powered by: erelego.com